सकाळ

# 'सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी मराठी महाविद्यालय'

मुंबई, ता. ३० : महाराष्ट्र- कर्नाटक सीमाभागाची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत विद्यापीठाचे उपकेंद्र म्हणून नवीन शासकीय मराठी महाविद्यालय लवकर स्थापन करण्यात येणार आहे, असे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. सीमाभागात महाविद्यालये स्थापन करणे तसेच शैक्षणिक सुविधा निर्माण करण्यासंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी श्री. सामंत बोलत होते.

श्री. सामंत म्हणाले, 'कोल्हापूर जिल्हाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात या शासकीय मराठी महाविद्यालयासाठी पाच एकर जमीन उपलब्ध झाल्यानंतर त्याचा आराखडा तयार करून या महाविद्यालयाला शासन स्तरावरील सर्व मान्यता देण्यात येतील. पुढील शैक्षणिक वर्षापासून हे महाविद्यालय सुरू करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सन २०२१-२०२२ पासून प्रवेश देण्यात येतील. सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन त्यांना अधिक दर्जेदार शिक्षण या महाविद्यालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येईल, असेही श्री.सामंत यांनी यावेळी सांगितले.

Kolhapur, Main
01/07/2020 Page No. 10

# सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांसाठी

# शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र

## समिती स्थापन; पाच एकर जागा निश्चितीनंतर बृहत आराखडा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सीमाभागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांचा विचार करून मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र किंवा नवीन शासकीय महाविद्यालय स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी ही माहिती दिली.

सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन त्यांना अधिक दर्जेदार शिक्षण देण्यासाठी हे शासकीय महाविद्यालय स्थापन केले जाणार आहे. या महाविद्यालयात २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश देण्यात येणार आहेत. सीमाभागात महाविद्यालय स्थापन करण्यासंदर्भात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सामंत यांनी ही बैठक घेऊन त्यासंदर्भात आदेश दिले.

त्यासाठी कोल्हापूर जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात या शासकीय मराठी महाविद्यालयासाठी पाच एकर जमीन उपलब्ध झाल्यानंतर त्याचा बृहत आराखडा तयार करून त्या महाविद्यालयाला शासनाकडून ज्या मान्यता आवश्यक आहेत त्या देण्यात येणार असल्याचेही सामंत यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र तसेच शासकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत उच्चशिक्षण संचालक, जिल्हाधिकारी कोल्हापूर, जिल्हा पोलिस अधीक्षक, डॉ. दीपक पवार, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव यांचा समावेश आहे.

### सरकारी इमारतीचा शोध घ्या

यावेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गडहिंग्लज अथवा चंदगड तालुक्यात रिकाम्या सरकारी इमारती असतील तर त्यांचा तातडीने शोध घ्या, अशी सूचना जिल्हा प्रशासनाला केली. जागा शोधून त्यावर इमारत उभारणीला विलंब होईल, त्यापेक्षा तयार इमारतीचा चांगल्याप्रकारे वापर करता येईल आणि लवकर उपकेंद्र कार्यान्वित होईल, असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या सूचनेनुसार निवासी उपजिल्हाधिकारी भाऊ गलांडे यांनी आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश गडहिंग्लज प्रांताधिकाऱ्यांना दिले. शुक्रवारी (दि. ३) प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर कोल्हापुरात येणार असून, त्यावेळी बैठक घेऊन या कामाला गती दिली जाईल, असे गलांडे यांनी यावेळी सांगितले.

लोकमत

# दोन्ही सत्रांच्या परीक्षा एकत्र घेणे शक्य

## शिवाजी विद्यापीठाला प्रस्ताव

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : कोरोनामुळे महाविद्यालयांचे शैक्षणिक सत्र अडचणीत आले आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी पुढील वर्षात दोन्ही सत्रांच्या परीक्षा एकत्रित घेण्याचा मार्ग शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे माजी सदस्य प्रा. मिलिंद वडमारे (सांगली) यांनी सुचविला आहे.

प्रा. वडमारे यांनी कुलगुरुंना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, २०१९-२० च्या अंतिम वर्षाच्या परीक्षा संपवून निकाल लावण्यात ऑगस्ट संपणार आहे. त्याचवेळी २०२०-२१ या वर्षाची सुरुवात होणार आहे. ऑक्टोबरपासून सत्र परीक्षा सुरु होतील. जानेवारीमध्ये पुढील वर्ष सुरु होऊन लगेच फेब्रुवारी-मार्चमध्ये प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होतील. या अखंड चक्रामुळे या वर्षाचा निर्धारित अभ्यासक्रम पूर्ण करता येणार नाही. त्यामुळे या वर्षात पहिल्या सत्राची परीक्षा स्थगित करून दोन्ही सत्रांची परीक्षा वर्षाच्या शेवटी एकदाच घ्यावी. दोन्ही सत्रांसाठी १०० व ८० गुणांच्या दोन प्रश्नपत्रिका असाव्यात. प्रत्येक विभागासाठी ५० व ४० गुण द्यावेत. दोहोंसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका देऊन तपासणीही स्वतंत्र करावी. अंतिम वर्षात प्रत्येक विषयाचे १० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन सत्राच्या शेवटी देता येईल. दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्यांत कपात करावी, तसेच परीक्षेच्या कामकाजाची कायदेशीर सक्ती करावी.

# कोल्हापुरात सीमाभागासाठी सरकारी मराठी महाविद्यालय

- उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती
- पाच एकर जमीन उपलब्ध झाल्यानंतर आराखडा

प्रतिनिधी
मुंबई

सीमाभागाची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत विद्यापीठाचे उपकेंद्र तसेच नवीन शासकीय मराठी महाविद्यालय लवकरच स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी दिली. पुढील शैक्षणिक वर्षापासून हे महाविद्यालय सुरू होईल, असेही त्यांनी सांगितले.

कोल्हापूर जिल्हाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात शासकीय मराठी महाविद्यालयासाठी पाच एकर जमीन उपलब्ध झाल्यानंतर त्याचा बृहत आराखडा तयार करून सरकारी स्तरावरील सर्व मान्यता देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. सीमाभागात महाविद्यालय स्थापन करण्यासंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक झाली. यावेळी उदय सामंत म्हणाले, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून प्रवेश देण्यात येतील. या माध्यमातून सीमाभागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध होईल, असेही सामंत म्हणाले.

**मराठी महाविद्यालयासाठी समिती**

मराठी महाविद्यालय स्थापनेसाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. यात उच्च शिक्षण संचालक, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. दीपक पवार यांचा समावेश आहे.

# सीमा भागात शासकीय मराठी महाविद्यालय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** महाराष्ट्र - कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी नवे शासकीय मराठी महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केली.

शिवाजी विद्यापीठांतर्गत उपकेंद्र किंवा शासकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी समिती नेमण्यात आली असून पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२१-२२) हे महाविद्यालय सुरू करण्याचे नियोजन आहे. कोल्हापूर जिल्हाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात या शासकीय मराठी महाविद्यालयासाठी पाच एकर जमीन उपलब्ध झाल्यानंतर त्याचा बृहत आराखडा तयार करून या महाविद्यालयाला शासन स्तरावरील सर्व मान्यता देण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.